**दिनांक २५ जून २०२३ रोजी झालेल्या**
**विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

दिनांक १०.०६.२०२३ च्या नोटीसीद्वारे संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी दि. २५.०६.२०२३ रोजी सकाळी ९:३० पासून दुपारी ५:३० वाजेपर्यंत मुनोत सभागृहात या ठिकाणी बोलविण्यात आली होती. तसेच सायंकाळी ४:०० वाजल्यापासून शासन अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील (प्राधिकृत अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (०१), पुणे) यांच्या उपस्थितीत विकसक निवड प्रक्रियेला सुरुवात होऊन ५:३० ला पूर्ण झाली.

आजची विशेष सर्वसाधारण सभा संस्थेच्या पुनर्विकास कामी विकसक निवडणेकामी बोलावली आहे. आजवर संस्थेस पुनर्विकास कामी मार्गदर्शन करणारे संस्थेचे सल्लागार श्री. हर्षल कवडीकर व सौ. किरण काबरा तसेच शासन अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील (प्राधिकृत अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (०१), पुणे) यांची सदर विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष- श्री. विजय सावंत यांनी श्रीमती वंदना गलांडे- पाटील यांची संस्थेच्या सभासदांशी ओळख करून दिली.

सर्वप्रथम संस्थेचे सभासद श्री. प्रदीप नेवाळकर यांनी संस्थेच्या पुनर्विकास प्रक्रियेचा आजवरचा आढावा घेतला. पुनर्विकास प्रक्रिया राबविण्याकरिता गेले समिती सदस्य व पंच समिती सदस्य यांनी काही वर्षे संस्थेचे कमिटी/ केलेल्या कामकाजाची माहिती दिली व निवडक ०३ विकसकांच्या मिळालेल्या offers/ प्रस्ताव यांची माहिती दिली व तीनही विकसकांच्या संस्थेस प्राप्त प्रस्तावावरील (Offers) तुलनात्मक तक्ता संस्थेच्या सभासदांसमोर सादर केला.

**विषय क्र. ०१**: संस्थेच्या पुनर्विकासासंदर्भात प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करून प्राप्त निविदा धारकांची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून तिन निविदा धारकांचे सभासदांसमोर दि. २५.०६.२०२३ रोजी क्रमाने सादरीकरण होणार आहे. सदर तिन निविदाधारकांपैकी एकाची निवड करणे, त्याकरिता सभासदांचे गुप्त मतदान घेणे.

⇒ सदर विषय संस्थेच्या सभासदांसमोर वाचून दाखविलेनंतर संस्थेचे सल्लागार व मा. अध्यक्ष यांनी मतदान कसे करावी याची माहिती व सूचना दिली. सादरीकरण झालेनंतर प्राधिकृत अधिकारी यांचे समोर सभासदांनी आपले मत मतदानाद्वारे नोंदविण्यास तद्नंतर सुरवात केली. उपस्थित एकूण ८३ सभासदांनी (प्रत्यक्ष उपस्थित राहून) आपले मत मतदानपेटीत बंदिस्त केले. मतदान झालेनंतर उपस्थित सर्व सभासदांसमोर व प्राधिकृत अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील यांचेसमोर सदर मतदानपेटी उघडण्यात आली व रिकामी करण्यात आली. उपस्थित ८३ सभासदांची मते मोजण्यात आली. सर्व सभासदांसमोर मोजण्यात आलेल्या सभासदांची मते खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आली-

**१. मे. न्याती ग्रुप** {Nyati Group
(Nyati Developers + Shubham EPC +
Nirman Developers)}- - ७५
----
**२. मे. मॅजेस्टिक लँडमार्क ग्रुप**
{Majestique Landmark Group
(M/s. Majestique Duropolis Pvt. Ltd.)} - ०४

**३. मे. कोहीनूर ग्रुप** {Kohinoor Group - ०४

(Rising Associates LLP)} -

**४. बाद मते-** - 00

------------------------------------

**- ८३**

तद्नुसार ७५ मते प्राप्त होऊन मे. न्याती ग्रुप {Nyati Group (Nyati Developers + Shubham EPC + Nirman Developers)} संस्थेच्या एकूण १०२ पैकी ७५ सभासदांच्या बहुमताने संस्थेच्या पुर्नविकासकरिता सभासदांची पसंती असल्याचे जाहीर करण्यात आले.

**ठराव क्र. ०१**: संस्थेच्या एकूण १०२ सभासदांपैकी एकूण ८३ सभासदांनी मतदान केले असून ७५ सभासदांनी पसंती दिलेल्या 'मे. न्याती ग्रुप {Nyati Group (Nyati Developers + Shubham EPC + Nirman Developers)}' ला संस्थेच्या पुनर्विकास कामी विकसक म्हणून निवडण्याचा ठराव सर्व उपस्थित सभासदांनी बहुमताने पारित केला.

सूचक : श्री. मोरेश्वर जोशी
अनुमोदक : श्री. महेश प्रभुदेसाई

**विषय क्र. ०२**: विकसकांबरोबर करावयाच्या कराराच्या मुख्य अटी व शर्ती निश्चित करणे.

**ठराव क्र. ०२**: विकसकाबरोबर करावयाच्या मुख्य अटी व शर्ती संस्थेच्या कार्यकारिणी समितीने/ पंच समितीने रिडेव्हेलपमेंट कमिटीच्या मदतीने निश्चित करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

वरील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक : श्री. अनिरुद्ध अनगळ
अनुमोदक : श्री. सुहास देशपांडे

**विषय क्र. ०३** : निवड करण्यात आलेल्या विकसकास सभासदांनी स्वीकृती दिलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून इरादापत्र ( Letter Of Intent) देण्याकरिता सहया करण्याचे अधिकार संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना उपस्थित सर्व सभासदांनी मान्यता देणे.

**ठराव क्र. ०३** : विषय क्रमांक ०३ नुसार मा. अध्यक्ष व सचिव यांना अधिकार देण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

वरील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक : श्री. हेमंत आलबाल
अनुमोदक : श्री. वाय. व्ही. कृष्णमुर्थी

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून चहापानानंतर सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

**विनायक पटवर्धन सचिव**